**Name : Prof. Dr. Sangita Mangesh Khadse**

**Title of the Project (MRP)**

Buldhana Jilhyatil Varishtha Mahavidyaayin Vidyarthinincha Antar Mahavidyalayin Krida Spardhetil Sahabhag : A study Section (2005-2010)

File No :

23-583/12 (WRO)

Executive Summary of the Project.

**बुलडाणा जिल्हयातील वरिष्ठ महाव्द्यिालयीन व्द्यिार्थिनींचा आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभाग :-एक अध्ययन ;कालावधी २००५-२०१०द्ध**

# सारांश

**द्वबुलडाणा जिल्हयातील वरिष्ठ महाव्द्यिालयीन व्द्यिार्थिनींचा आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभाग : एक अध्ययन** द्व या विषय लघुशोध प्रकलपाच्या अनुषंगाने तयाार करण्यात आलेल्या संशोधन अहवालाची रचना एकूण पाच प्रकरणात करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रकरण पहिले प्रस्तावना यात प्रस्तावाला क्रीडा क्षेत्रात महिलांचा सहभाग ऐतिहासीक पाप्रवभुमि प्रमुख शब्दाची व्याख्या संशोधन कार्याक्षेत्राची निवड व ओळख खेळांडुना येणा-या समस्या याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली असुन संशोधनाचे महत्व संशोधनाचे उददेश गृहित कृत्य मर्यादा परिभाषा या विषयी पुढिल प्रमाणे

अध्ययनाचे महत्व :-

०१. बुलडाणा जिल्यामध्ये महिला खेळाडुंची प्रगती निदर्शनात आली.
०२. कोणत्या खेळामध्ये बुलडाणा जिल्ह्यातील महिला खेळांडुना रूची आहे. हे समजले
०३. आंतरमहाद्यिालयीन क्रीडा स्पर्धेमध्ये घडणारा कल निर्दशनास आला.
०४. महिलांच्या त्यांचे क्रीडा सहभागाकडे पाहण्याची सामाजीक व आर्थिक व मनोवैज्ञानिक प्रवृती व प्रेरणा या बाबत संशोधन मार्गदर्शन ठरेल.
०५. क्रीडा क्षेत्रात असणा-या क्रीडा संघटना शिक्षक प्रशिक्षक यांना हे संशोधन मार्गदर्शन ठरेल.
०६. महिला खेळांडुचे त्यांचे खेळाडुकडे कल जानन्याचा दृष्टिकानातुन बुलडाणा जिल्याकरीता हे अध्ययन मार्गदर्शन ठरेल.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

०१. विद्यार्थीनीचा खेळ सहभागातील घटकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला.
०२. विद्यार्थीनीच्या खेळाडुंच्या कामगिरीविषयी अभ्यास करण्यात आला.
०३. विद्यार्थीनीच्या खेळातील सहभाग त्यांचे यश व अपयश या बाबत अभ्यास करण्यात आला.
०४. मागील पाच वर्षामध्ये सहभागी झालेल्या महिला खेळाडुंना येणा-या वेगवेगळ्या अडचणींचा अभ्यास करण्यात आला.
०५. विद्यार्थीनीचे खेळातील सहभागाविषयी ज्ञान जाणून घेण्यात आले.
०६. सर्वांगीन विकासाच्या दृष्टिने मार्गअर्शन करण्यात आले.

## संशोधन समस्येची संबंधीत चले :-

शारीरिक शिक्षण खेळ शारीरिक सदृढता सुविधा

## गृहितकृत्य :-

लुंडबर्ग यांच्या मते, गृहितकृत्य म्हणजे ज्या विधानाची सत्यता पारखुन घ्यावयाची आहे असे विधान होय. तर गुड आणि हॅट्स यांच्या मते गृहितकृत्य अथवा उपकल्पणा म्हणजे असे अनुमान होय कि जे तथ्य निरिक्षणावर आधारलेले असुन ज्यामुळे भावी संशोधन कार्याला चालना मिळत असते. या विवेचनाच्या अनुशंगाने प्रस्तुत संशोधनाकरिता पुढिल प्रमाणे गृहितकृत्य घेण्यात आले होते.

०१. ग्रामीण भागातील मुलींचा खेळातील स्तर खालावलेला आहे.

०२. ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे मुलींच्या सहभागाविषयी गरजा पुर्ण होत नाहीत व त्या अतिशय दुर्लक्षित झ्यालेल्या दिसुन येतात.

०३. सोई व सुविधांचा अभाव आहे.

०४. खेळामध्ये सहभागाचीजबाबदारी पेलण्याची तयारी आढळुन येत नाही.

०५. वरिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थीनीचा सहभाग हा पुरूष खेळाडुंच्या तुलनेत कमी आहे.

**संशोधनाची व्याप्ती :-**

०१. सदर संशोधन बुलडाणा जिल्ह्यातील निवडक १० वरिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक १० आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभाग घेणा-या विद्यार्थीनीपर्यंत मर्यादीत होते.

०२. हे अध्ययन १० वरिष्ठ महाविद्यालयापुरते मर्यादीत होते.

०३. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेसाठी ज्या स्पर्धा होतात. फक्त तेच क्रीडा प्रकार अध्ययनात घेतल्या गेले.

तसेच प्रकरण २ रे संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा यामध्ये संशोधन विषयाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंधित साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.

तसेच प्रकरण ३ रे संशोधन पध्दती व तंत्रयामध्ये सदर संशोधन विषयाच्या अनषंगाने उपयोगात आनलेल्या संशोधन पध्दती व तंत्र या विषयी सविस्तर विवेचन करण्यात आलेले असुन त्याबाबत थोडक्यात माहिती पुढिल प्रमाणे :-

**संशोधन पध्दती :-**

ज्ञानाचे क्षेत्र व्यापक करण्याकरीता, समस्याचे आकलन व निराकरण करण्याकरीता आणि मानवी जीवन प्रगतीशील व संशोधन हे महत्वाचे साधन आहे. ज्ञान मिळवण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करण्याच्या प्रक्रियेला संशोधन म्हणता येईल कारण या पध्दतीत तर्कसंगत विचार प्रणालीचा उपयोग शास्त्रशुद्ध रितीने समस्या निराकरणासाठी केला जातो. संशोधनाचा प्रमुख हेतु नवे ज्ञान प्राप्त करणे विद्यमान तथ्यांबद्दल नवा दृष्टिकोन प्रस्तुत करणे. घटनांचे विश्लेषण करून त्यातील संबंध नव्याने प्रस्तापित करणे, जुन्या मानसाधनामध्ये सुधारणा घडवुन आणणे, किंवा अधिक कार्यक्षम नवी साधने तयार करणे आणि या सर्वाद्वारे जगाबद्दलचे आपले एकंदर ज्ञान वाढवुन मानवाच्या प्रगतिला पोषक परिस्थिती निर्माण करणे होय. तसेच त्मेमतबी क्मेपहद पे जीम ैचमबपपिबंजपवद वि डमजीवक ।दक च्तवबमकनतम वित ।बबनतपदह जीम पदवितउंजपवद छममकमक या अभ्यास पध्दतीचा व्याख्येनुसार तसेच नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रथ्तापीत, स्विकृत निष्कर्ष व सिध्दांताचे पुनःपरिक्षण करण्याच्या हेतुने चिकित्सक व सखोल चौकशीत प्रयोग म्हणजेच संशोधन होय.

वरिल विधानांच्या अनूषंगाने **९९**बुलडाणा जिल्हयातील वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थीनींचा आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभागः एक अध्ययन**९९** या संशोधनाकरिता अन्वेषनात्मक किंवा परिचायात्मक संशोधन पध्दती ;म्गचसवतंजपवअम वत वितउनसंजपवद त्मेमतबी डमजीवकद्ध तसेच सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला होता.

**सर्वेक्षण :-**

सर्वेक्षण याचा शाब्दिक अर्थ कोणत्याही वस्तूचे अथवा घटनेचे सुक्ष निरीक्षण्व परिक्षण होय सर्वेक्षणाला इंग्रजीमध्ये ै;नतअंल द्ध म्हणतात हा शब्द ै;नत द्ध म्हणजे वरून ;टमवपतद्ध म्हणजे पाहने असा, चिकित्सक पाहणी करणे म्हणजेच सर्वेक्षण होय. तसेच वेबस्टर कॉलेज विश्वकोषात सर्वेक्षणाची व्याख्या पुढिल प्रमाणे दिसुन येते अचुक माहीती देणारे चिकित्सक तपासणी म्हणजे सर्वेक्षण होय.

वरील विवेचनाच्या अनुसंगाने प्रस्तुत संशोधनाकरीता अनवेशनात्मक तसेच सर्वेक्षण पध्दतीचा उपयोग करण्यात आला होता.

**नमुना निवड पध्दती :-**

सामग्रीच्या एका भागाच्या अध्ययनावरून त्या विश्वतील सामग्रीतील विशिष्ठ लक्षणाबाबत विश्वसनीय निष्कर्ष किंवा अनुमान बांधण्याकरीता सामग्रीवरून पाहणीसाठी एक भाग निवडण्याच्या पध्दतीस नमुना निवड असे म्हणतात.

नमुना निवडीच्या वरील आधाराच्या अनुषंगाने, **श्श्बुलडाणा जिल्हयातील वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थीनींचा आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील सहभागः एक अध्ययनश्श** या संशोधन करिता निवड पदध्तीच्या सुगम यादृच्छिक नमुना पध्दतीच्या लॉटरी सोडत पध्दतीचा उपयोग करून **बुलडाणा जिल्हयातील एकूण दहा निवडक वरिष्ठ महाविद्यालयातील पत्येकी १० आंतर महाविद्यालयातील खेळाडु विद्यार्थीनींची १०० विद्यार्थीनींची निवड करण्यात आली होती.**

त्याच प्रमाणे प्रकरण ४ थे प्राप्त विद्यार्थीनीच्या क्रीडा स्पर्धेतील सहभागाचे मूल्यमापण या प्रकरणात प्राथमिक तसेच द्वितीयक स्त्रोताद्वारे प्राप्त तथ्यांचे सांख्यिकीय विश्लेषण करून शेकडा प्रतिशत प्रमाणपध्दती द्वारे करण्यात आले असून या तथ्यांचे सादरिकरण विविध सारण्या आणि आलेखाद्वारे करण्यात आलेले आहे.

तसेच प्रकरण ५ वे निष्कर्ष व उपाययोजना यामध्ये प्राप्त तथ्यांचे सांखिकीय विश्लेषण केल्यानंतर प्राप्त निष्कर्ष आणि उपाययोजना या विषयी माहिती देण्यात आलेली आहे. ती पुढिल प्रमाणे आहे.:-

समग्रीचे सांखिकीय विश्लेषण आणि निर्वचन केल्यानंतर प्राप्त निष्कर्ष :-

०१. संशोधनावरून असा निष्कर्ष निघतो कि, वरीष्ठ शिकत असलेल्या विद्यार्थीनीचे वय हे १७-२१ वर्षा दरम्यान असूण त्यांची एकूण संख्या ५५ इतकी आहे तर त्याचे एकूण शेकडा प्रमाण ६४.७१ इतके आढळुन आले

०२. सर्वात जास्त म्हणजे एकूण ३० ;३५.२९:द्ध उत्तरदात्या विद्यार्थीनींनी इतर स्पर्धेतेत सहभाग घेतला आहे. असल्याचे संशोधनावरून स्पष्ट होते.

०३. संशोधनावरून असा निष्कर्ष निघतो कि, सर्वात जास्त विद्यार्थिनींना म्हणजेच एकूण ३० ;३५.२९:द्ध घरातुन प्रोत्साहन मिळाल्यामुळे त्यांना खेळामध्ये आवड निर्माण झाल्याची दिसुन येते.

०४. सर्वात जास्त म्हणजे एकूण ३५ ;४१.१८:द्ध विद्यार्थिनींच्या मते त्यांना प्रशिक्षकांचा अभाव जाणवतो असे त्यांचे मत असल्याचे संशोधनाच्या अंती आढळुन आले.

०५. संशोधनावरून असा निष्कर्ष निघतो कि, तुमच्या आवडीचा खेळाचा तुम्ही नियमीत सराव करता. या विधानाबाबात एकूण ६५ ;७६.४७:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुनतः सहमत आहेत.

०६. क्रीडा स्पर्धेत सहभागात अडचणी येतात या विधानाबाबत एकूण ५० ;५८.८२:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

०७. तुमच्या क्रीडा कामगिरीविषयी आपण समाधनी आहात या विधानाबाबत एकूण ४८ ;५६.४७:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

०८. आपल्या आवडत्या खेळाबद्दल आपल्यास संपुर्ण ज्ञान आहे. या विधानाबाबत एकूण ६८ ;८०.००:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

०९. संशोधनावरून असा निष्कर्ष निघतो कि, क्रीडा प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभते या विधानाबाबत एकूण ६६ ;७७.६५:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

१०. खेळाडुंना मिळणा-या सुविधा त्यांच्या आवश्यकतेनुसार नसल्यास खेळाडूंच्या खेळावर परिणाम होतोया विधानाबाबत एकूण ६० ;७०.५९:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

११. संशोधनावरून असा निष्कर्ष निघतो कि, प्रशिक्षकांचे वागणुकीमुळे सुध्दा खुळांडुवर परिणाम होतो या विधानाबाबत एकूण ५८ ;६८.२४:द्ध विद्यार्थीनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

१२. वैयक्तीक प्रकारातील क्रीडा स्पर्धेतील सहभागी खेळाडुवर दबाव असतो. या विधानाबाबत एकूण ४५ ;४५.६४:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

१३. सांधीक खेळाडुवर मानसीक ताण येत असतो. या विधानाबाबत एकूण ३८ ;४४.७१:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

१४. विशिष्ट क्रीडा प्रकारात मानोवृत्तीची आवश्यकता असते या विधानाबाबत एकूण ६२ ;७२.६४:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

१५. सांधीक क्रीडा कौशल्यांनाही मानसिक प्रशिक्षणाची जोड लागते. या विधानाबाबत एकूण ५५ ;६४.७१:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

१६. संशोधनावरून असा निष्कर्श निघतो कि, बौध्दीक, शारीरिक, मानसिक या सर्वच क्षमतांचा विकास खेळाडूंच्या दृष्टिने काळाची गरज आहे. या विधानाबाबत एकूण ६५ ;७६.४७:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

१७. क्रीडांगणावर विविध क्रीडा प्रकारातुन मैत्री आणि सदभाव वाढतो या विधानाबाबत एकूण ५८ ;६८.२४:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

१८. क्रीडांगणांवर विविध क्रीडा प्रकारातुन सामाजीकता आणि माणूसकी या गुणांचा विकास होतो या विधानाबाबत एकूण ४६ ;५७.६५:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

१६. खेळाडुंच्या बौध्दीक शारीरिक मानसिक गुणांचा विकास खेळामधुन होतो. या विधानाबाबत एकूण ४७ ;५५.२६:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. खेळ ही एक नैसर्गीक व्याप्ती या विधानाबाबत एकूण ५४ ;६३.५३:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

२०. पालकांचे तसेच क्रीडा शिक्षकांचे प्रोत्साहन हे खेळाडूंच्या प्रेरणासाठी महत्वाचे असते या विधानाबाबत एकूण ५६ ;६५.८८:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

२१. खेळामधुन आक्रमकता शिकविल्या जाते. या विधानाबाबत एकूण ४८ ;५६.४७:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

२२. क्रीडा प्रकारात उच्च प्राविण्य प्राप्त करून देण्यासाठी खेळाडु जवळ प्रभावी व्यक्तीमत्व असने आवश्यक आहे. या विधानाबाबत एकूण ६७ ;७८.८२:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

२३. आंतरमहाविद्यालयीन खेळाडु हे ताणतणावात असतात या विधानाबाबत एकूण ५३ ;६२.६५:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

२४. वैयक्तिक खेळातील खेळाडुंचे मानसीक व्यवहार भिन्न भिन्न असतात या विधानाबाबत एकूण ४३ ;५०.५६:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. सांधिक खेळातील खेळाडुंचे मानसिक व्यवहार भिन्न भिन्न असतात या विधानाबाबत एकूण ४५ ;५२.६४:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

२५. संघनिवडीच्या वेळेस सुध्दा मानसशास्त्र चाचण्या घेतल्या जात नाही. या विधानाबाबत एकूण ५८ ;६८.२४:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे.

२६. वैयक्तिक व सांधिक क्रीडा प्रकारात प्रत्यक्ष सहभागी झाल्याशिवाय व्यक्तिमत्वाच्या विविध गुणांचा विकास होणार नाही. या विधानाबाबत एकूण ४८ ;५६.४७:द्ध विद्यार्थींनी उत्तरदाते पुर्णतः सहमत आहे. असे संशोधनाअंती दिसुन येते.

**उपाययोजना :-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्राप्त निष्कर्षाच्या आधारे पुढिल उपाय योजना सुचविण्यात येत आहे :-

०१. खेळांचा विचार करतांना योग्य प्रशिक्षकांची नेमणुक करण्यात यावी.

०२. खेळाडुंना योग्य त्या सुविधा पुरविण्यात याव्या.

०३. खेळाडुंची योग्य रितीने बौध्दीक, शारीरिक, मानसिक खेळातील आवड यांची चाचणी घेण्यात यावी.

०४. खेळाडुंना घरून मार्गदर्शन मिळवण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्यात यावे.

०५. खेळाडुंना ज्या खेळात आवड आहे त्यांची योग्य सुविधा पुरविण्यात याव्यात.

या संशोधन विषयाच्या अनुषंगाने सुरूवातीला घेण्यात आलेले उद्दिष्टे तसेच गृहितकृत्ये हे प्राथमिक तसेच द्वितीयक स्त्रोताद्वारे प्राप्त माहितीचे शेकडा प्रतिशत प्रमाण पध्दतीद्वारे सांख्यिकीच्या पध्दतीद्वारे विश्लेषण केल्यानंतर सिध्द झाल्यामुळे गृहितकृत्ये व उदिदष्ट स्विकृत करण्यात येत आहे.

## संदर्भ ग्रंथसूची :-


०१. आलेगांवकर पी.एम ;२००६द्ध प्रगत कीडामानसशास्त्र, कॉन्टीनेन्टल प्रकाशण पुणे.

०२. आठवले उषा, व्यक्तिमत्व विकासातुन सामाजिक विकास ;२००४द्ध

०३. भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पध्दती ;१९८८द्ध

०४. भारतीय खेळ प्राधिकरण शारीरिक शिक्षणाचा इतिहास व पाया ;२००२द्ध

०५. भटकर प्रा. आर.एम. शारीरिक शिक्षणाचा जागतिक इतिहास ;१९८०द्ध

०६. मुडबिद्रीकर बा.शा.भारत महाराष्टभ आणि शारीरिक शिक्षण ;१९८८द्ध

०७. वाखारकर दि.गो. शारीरिक शिक्षणाचे ऐतिहासीक स्वरूप ;१९८४द्ध

०८. सोनवणे संजीव शारीरिक शिक्षण ;२००५द्ध

०९. कांगणे सोपान शारीरिक शिक्षण ;२००७द्ध

१०. पाटील वा.र.शैक्षणिक मानसशास्त्र ;१९९६द्ध

११. पेरूळकर, आशा, व्यक्तिमत्व विकास ;१९९१द्ध

१२. शास्त्री, विवेक व्यक्तिमत्व विकास दिपस्तंभ ;१९८५द्ध

13- Kamlesh M.L. Methodology Of Research in Physical Education. And Sports (1994)

१४. काचोळे दा.धो. समाजिक संशोधन पध्दती ;१९९३द्ध


दिनांक :- संशोधनकर्ती

ठिकाण :- प्रा.डॉ.संगीता मंगेश खडसे